**अपिलेट प्राधिकरण, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन**
**यांच्यासमोरील पुर्ननिरिक्षण अर्ज**

कॉग्निझेन्ट टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि.
प्लॉट नं. २६, राजीव गांधी इन्फोटेक पार्क,
एम.आय.डी.सी. हिंजेवाडी,
पुणे ४११०५७ वादी

विरुध्द

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईट, ३ रा मजला, प्रतिवादी
सायन (पूर्व) मुंबई.

**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मे.कॉग्निझेंन्ट टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि. या उद्योगास कंन्सेट टू एस्टयॉब्लिश देतांना वाढीव फी ची आकारणी करण्याविरुध्द जल प्रदुषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ च्या कलम २६ व २८ आणि हवा प्रदुषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ च्या कलम २१ व ३१ नुसार अपिल अर्ज.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मे. कॉग्निझेन्ट टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि. या उद्योगास कंन्सेट टू एस्टयॉब्लिश देतांना वाढीव फी ची आकारणी केली असून त्याविरुध्द कंपनीने जल प्रदुषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ च्या कलम २६ व २८ आणि हवा प्रदुषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ च्या कलम २१ व ३१ नुसार अपिल अर्ज केला आहे.

२. कंपनीला मार्च,२००८ पासून फेब्रुवारी, २०१४ पर्यत ०.०२ टक्क्याने कंन्सेट टू एस्टयॉब्लिशची परवानगी देतांना फी आकारली आहे. तथापी कंपनीने डिसेंबर, २०१० पूर्वी कंन्सेट टू एस्टयॉब्लिशसाठी अर्ज केला असून त्यामुळे कंपनीकडून मार्च,२००८ ते २४/८/२०११ पर्यत ०.०१ टक्क्याने तर २५/८/२०११ ते फेब्रुवारी, २०१४ पर्यत ०.०२ टक्क्याने फी आकारणी करणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने असे स्पष्ट केले की, मंडळाच्या परिपत्रकानुसार आयआयटी कंपन्यांना सन २००८ पासून ०.०१ टक्क्याने कंन्सेट टू एस्टयॉब्लिशसाठी फी आकारण्यात येवू लागली. तर दिनांक १८/१०/२०११ परिपत्रकानुसार शासन निर्णय दिनांक २५/८/२०११ पासून ०.०२ टक्क्याने फी आकारण्यात यावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या नुसार मंजूरीसाठी प्रलंबित असलेल्या कंन्सेट टू एस्टयॉब्लिशसाठीच्या सर्व प्रकरणांमध्ये मंजूरीच्या दिनांकापासून नवीन दराने फी आकारण्यात येत असल्याने या प्रकरणी कंपनीचा अर्ज जरी डिसेंबर, २०१० पासून प्रलंबित असला तरी त्याला मंजूरी मात्र दिनांक ३/४/२०१२ नंतर

देण्यात आली असल्यामुळे सुधारित दराने फी आकारण्यात येत आहे. केवळ या अर्जदार कंपनीकडून (एकाच कंपनीकडून) अशी मागणी करण्यात आलेली नसून सरसकट सर्वांसाठीच ही बाब लागू आहे. असे प्रतिपादन केले. यापूर्वी अपिलेट प्राधिकरणासमोर कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित न राहील्यामुळे एकतर्फी निर्णय होवून कंपनीचा अर्ज यापूर्वी फेटाळण्यात आला होता.तथापी यावेळी कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते व त्यांनी उपरोक्त वस्तुस्थिती विशद करुन असे प्रतिपादन केले की, दिनांक २५/८/२०११ च्या मंडळाच्या परिपत्रकामध्ये सदर निर्णय जाहीर केलेल्या दिनांकापासून लागू होईल असे नमूद केले असून सुध्दा मंडळाने डिसेंबर, २०१० पासून ०.०२ टक्क्याने फी आकारणी करणे ही कायदेशीर बाब नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता या प्रकरणी मंडळामार्फत सुधारित दर हे दिनांक २५/८/२०११ पासूनच घेणे आवश्यक होते. व त्यापूर्वीच्या कालावधीसाठी सुधारित दराने दर आकारणी करणे कायदेशीर ठरणार नाही हे पाहता मंडळाने दर आकारणी करतांना दोन टप्प्यामध्ये दर आकारणी करावी व तसेच दिनांक २५/८/२०११ च्या आपल्या आदेशात आवश्यक ते बदल करावेत यास समितीने मान्यता दिली.

| | | |
|---|---|---|
| अधिक्षक अभियंता<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,<br>सदस्य, अपिलेट प्राधिकरण | जल अभियंता<br>बृहन्मुंबई, महानगरपालिका मुंबई<br>सदस्य, अपिलेट प्राधिकरण | सचिव<br>पर्यावरण विभाग, मंत्रालय,<br>अध्यक्ष,अपिलेट प्राधिकरण |